# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ०२.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०१/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३८,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०१/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ६.१२ लिटर दारू असा एकुण २,७२०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक ०१/०९/२०२२रोजी फिर्यादी सौ शामल भालचंद्र भवसार रा रामाकृष्णा नगर अकोला बायपास बळसोंड हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२६.०८.२२ रोजी चे १६:३० वा चे सुमारास रेल्वे स्टेशन रोड हिंगोली मार्केट कमीटी हिंगोली येथे अज्ञात आरोपीने फिर्यादीचे साक्षीदाराचे सोन्याचे दागीने २,५५,००० रू चा माल रेल्वे स्टेशन रोड हिंगोली मार्केट कमीटी हिंगोली येथे हरीतालीका शिवपुराण कथा कार्यक्रमा दरम्यान चोरले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.